# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०४.०६.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतून मानवी तस्करी व व्यवसायीक लैंगीक शोषणाची जाळी उखडून टाकण्याच्या उद्देशाने नागपूर शहरात सुरू असलेल्या **''ऑपरेशन शक्ती अंतर्गत''** दिनांक ०३.०६.२०२६ चे १७.५५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, छत्रपती चौक ते नरेंद्र नगर रेल्वे बोगदा कडे जाणाऱ्या रोडवर सार्वजनिक ठिकाणी पंटरसह सापळा रचुन, एका बर्गमॅन मोपेड क्र. एम.एच. ४० डि.जे. १३७७ वरील ईसम व महीला यांना ताब्यात घेतले. ईसमास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने आपले नांव धम्मदीप रविंद्र गजभिये, वय २२ वर्षे, रा. भिवसनखोरी, दाभा, गिट्टीखदान, नागपुर असे सांगीतले. त्याने देहव्यवसाय करीता सोबतचे महीलेस प्रवृत्त करून, तिचेकडुन देहव्यापार करवुन घेण्याकरीता सोबत आणलेले होते. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता पिडीत महीलेकडुन देहव्यवसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन ०१ पिडीत महीलेची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन रोख १,५००/—रू., ०२ मोबाईल फोन व सुझुकी बर्गमॅन मोपेड असा एकुण किंमती अंदाजे १,७२,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी विरूध्द पोलीस ठाणे धंतोली येथे कलम १४३(२), १४३(३) भा.न्या.सं., सहकलम ३, ४, ५, ७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव धंतोली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी नागपूर शहर चे मा. पोलीस आयुक्त, श्री. रविन्द्रकुमार सिंगल, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंन्द्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. राहुल माकणीकर, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. अभिजीत पाटील यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. राहुल शिरे, सपोनि. शिवाजी नन्नावरे, पोहवा. लक्ष्मण चौरे, नापोअं. शेषराव राऊत, पोअं. समिर शेख, कुणाल बोडखे, अश्वीन मांगे, नितीन वासने व मपोहवा. आरती चव्हाण यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.०६.२०२६ चे ०३.०० वा. ते ०६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट नं. १७, गोल्डन पॉईंट ले—आऊट, व्हीला ६८ जवळ, विहीरगांव, नागपुर येथे राहणारे फिर्यादी युवराज तुळशिराम ठवकर, वय ४८ वर्षे हे आपले परिवारासह राहते घरी झोपले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने

फिर्यादीचे घराचे मागील दरवाजाची कडी–कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, घरातील आलमारी व सुटकेसमधील रोख २,१५,०००/–रू. व सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ५,०४,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. अमजतशहा शेख ९९९१९९५१९१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे राणाप्रतापनगर :– फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे राणाप्रतापनगर हद्दीत, प्लॉट नं. ९०, भाऊसाहेब सुर्वे नगर, राणाप्रतापगनर, नागपुर येथे राहनारे फिर्यादी अर्जींक्य अजय जोशी, वय २७ वर्षे यांना बांधकामाकरीता सिमेंट पाहीजे असल्याने त्यांचे वडील अजय जोशी, वय ६५ वर्षे यांनी दिनांक २२.०५.२०२६ चे १३.३० वा. ते १५.३० वा. चे दरम्यान, गुगल प्लॅटफॉर्म वर ऑनलाईन पध्दतीने सर्च केले असता, त्यांचे मोबाईल क्रमांकावर नॉन ट्रेड सिमेंट प्रोव्हाईडर विपीन गुप्ता नावाचे ईसमाने मोबाईल फोन वरून संपर्क करून, फिर्यादीचे वडीलांना सिमेंट बॅग व किंमतीबाबत सविस्तर माहीती दिली. फिर्यादीचे वडीलांना किंमत पटल्याने त्यांनी आरोपीला १००० बॅग सिमेंट चा ऑर्डर दिला व त्यांचे बॅकचे खात्यातुन आरटिजिएस ने आरोपी विपीन गुप्ता याने सांगीतलेल्या एम.पि. बिरला परफेक्ट कंपनीचे डायरेक्टर शिवम कुमार यांचे खात्यावर एकुण २,३०,०००/– रू. वळते केले. फिर्यादीचे वडीलांनी संपर्क केला असता, आरोपीने नंतर कोणताही प्रतीसाद दिला नाही. तसेच, सिमेंट बॅग सुध्दा पाठविल्या नाहीत. आरोपीने फिर्यादीचे वडीलांचा अन्यायाने विश्वासघात करून, ऑनलाईन आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे पोउपनि. मनोहर दंदाले ९६३७७३१२७२ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(४), ३१९(२) भा.न्या.सं., सहकलम ६६(सि), ६६(डि) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे जुनी कामठी</u> :–** कु. किरण हरीराम कश्यप, वय २२ वर्षे, रा. खैरी बुध्द विहार जवळ, अग्रवाल चे घरी किरायाने, कामठी, जि. नागपूर ही दिनांक २९.०५.२०२६ चे २१.३० वा. पासुन पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग– सावळा, चेहरा– गोल, बांधा– सडपातळ, उंची– ४ फुट २ इंच, केस– काळे लांब, अंगात– हिरव्या रंगाचा कुर्ता व गुलाबी रंगाची लॅगीन घातलेले आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलते.

**<u>२) पोलीस ठाणे सक्करदरा</u> :–** कु. पुजा केशवराव ढाक, वय २२ वर्षे, रा. प्लॉट नं. ३७३, आशिर्वाद नगर, ठाकरे शाळेजवळ, सक्करदरा, नागपूर ही दिनांक ०२.०६.२०२६ चे १८.३० वा. पासुन पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट १ इंच, केस– काळे लांब, अंगात– मेहंदी रंगाचा ज्यावर पांढऱ्या रंगाचे फुले असलेला टॉप घातलेले आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलते. ओळख– उजव्या कानाजवळ मोस आहे. सोबत– ॲक्टीवा गाडी क्र. एम.एच. ४९ ए.एच. २८७४ घेवुन गेली आहे.

**<u>३) पोलीस ठाणे मानकापुर</u> :–** कु. पंचो सुखचंद भलावी, वय १७ वर्षे, रा. कार्तीक नगर, गोधनी रेल्वे, नागपूर येथील बांधकामाचे ठिकाणी झोपडीमध्ये ही दिनांक २३.०३.२०२६ चे २३.४५ वा. पासुन पोलीस ठाणे मानकापुर हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग– गोरा, चेहरा– गोल, बांधा– मजबुत, उंची– ५ फुट ५ इंच, केस– काळे लांब, अंगात– काळ्या रंगाचा टॉप व काळ्या रंगाची जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा– हिंदी बोलते. ओळख– उजव्या हातावर तिन स्टार व इंग्रजी अक्षर पि गोंदलेले आहे.



किरण



पुजा



पंचो

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उपनिरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**